दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ५० • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.१० नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राष्ट्रवादी कुणाची, २० नोव्हेंबरला पुढील सुनावणी

## नाव–चिन्ह प्रकरणी निवडणूक आयोगासमोर सिंघवी यांचा दीड तास युक्तिवाद

**मुंबई । वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव व घड्याळ या निवडणूक चिन्हाच्या मुद्यावर निवडणूक आयोगापुढे महत्त्वपूर्ण सुनावणीला सुरुवात झाली आहे. या सुनावणीसाठी शरद पवार स्वतः निवडणूक आयोगाच्या कार्यालयात हजर झालेत. या प्रकरणी आज शरद पवार गटाचा युक्तिवाद होणार आहे. या सुनावणीसाठी दोन्ही गटांचे जवळपास १८ ते २० नेते हजर झालेत. त्यामुळे या सुनावणीकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे.याआधी अजित पवार यांच्या गटाकडून युक्तिवाद करण्यात आला होता. अजित पवार यांच्या गटाच्या वकिलांनी भूमिका मांडण्यासाठी वेळ वाढवून मागितला होता. त्यामुळे निवडणूक आयोग युक्तिवादासाठी वेळ वाढवून देते का? की शरद पवार यांच्या गटाचा युक्तिवाद आज सुरु होतो? याकडे राज्याचं लक्ष आहे. दोन्ही गटाचा आज युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर निवडणूक आयोग आज निकाल राखून ठेवून निकालाची तारीख जाहीर करतं का? हे पाहणं देखील महत्त्वाचं ठरणार आहे.९ ऑक्टोबर रोजी मागील सुनावणी झाली होती. त्यावेळी अजित गटाच्या वतीने निवडणूक आयोगाला सादर करण्यात आलेल्या ९००० हून अधिक कागदपत्रांमध्ये अनियमितता आढळल्याचा दावा शरद गटाने केला होता. शरद पवार यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक



मनु सिंघवी निवडणूक आयोगासमोर हजर झाले. ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या सुनावणीत अजित पवार गटाने केलेल्या दाव्यांवर निवडणूक आयोगाने शरद गटाला ३० ऑक्टोबरपर्यंत उत्तर दाखल करण्यास सांगितले होते.वास्तविक, अजित पवार यांनी दावा केला होता की, त्यांना महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या ५३ पैकी ४२ आमदारांचा, ९ पैकी ६ आमदारांचा, नागालँडमधील सर्व ७ आमदारांचा आणि राज्यसभा आणि लोकसभेतील प्रत्येकी एका सदस्याचा पाठिंबा आहे. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हावर दावा करत ३० जून रोजी निवडणूक आयोगात याचिका दाखल केली होती.जुलै २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादीच्या ४० आमदारांसह महाराष्ट्रातील शिंदे सरकारमध्ये सामील झाले होते. आघाडी सरकारमध्ये त्यांना उपमुख्यमंत्रीही करण्यात आले. शरद पवार यांच्या पासून फारकत घेतल्यानंतर अजित यांनी राष्ट्रवादीत बहुमत असल्याचा दावा केला. त्यामुळे पक्षाच्या नावावर आणि चिन्हावर त्यांचा अधिकार सांगितला. शरद पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदावरून हटवण्याची घोषणा त्यांनी केली होती.दुसरीकडे शरद पवार यांनी पक्ष सोडलेल्या ९ मंत्र्यांसह ३१ आमदारांना अपात्र करण्याची मागणी केली आहे. अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष होणे आणि पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह घड्याळ वापरणे बेकायदेशीर असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.दोन्ही गटांनी पक्षाचे नाव आणि चिन्हावर दावा सांगण्यासाठी निवडणूक आयोगाकडे कागदपत्रे सादर केली आहेत. आयोगाने अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटांना ६ ऑक्टोबरला वैयक्तिक सुनावणीसाठी बोलावले होते

NCP
Nationalist Congress Party

# एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड, कर्मचारी-अधिकाऱ्यांना सहा हजार रुपयांचा बोनस जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**








कर्मचारी आणि अधिकारी यांना सरसकट ६००० रुपयांचा सानुग्रह बोनस जाहीर करण्यात आलाय. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी आता गोड होणार असल्याचं म्हटलं जातंय. मंत्री उदय सामंत यांनी यासंदर्भात माहिती दिली.मागील अनेक महिन्यांपासून तोट्यात असणाऱ्या एसटीची आर्थिक स्थिती काही प्रमाणात सुधारत असल्याचं चित्र आहे. त्यातच एसटी कर्मचाऱ्यांसाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय देखील शासनाकडून घेण्यात आले आहेत. तसेच एसटी महामंडळास स्व-मालकीच्या गाड्या खरेदी करण्यासाठी यंदाच्या वर्षी ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती देण्यात आलीये. मंत्री उदय सामंत आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत बैठक पार पडली या बैठकीमध्ये काही महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार खात्याअंतर्गत बढतीसाठी आवश्यक असणारी २४० दिवसांची अट रद्द होईपर्यंत सदर बढतीस स्थगिती देण्यात येईल. त्याचप्रमाणे सातवा वेतन आयोगानुसार वेतन देण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२३ पूर्वी सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाशी बैठक घेऊन निर्णय देण्यात येईल. या बैठकीत अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आलीय. कॅशलेस मेडिक्लेम योजनेसाठी तालुका आणि जिल्हास्तरावर रुग्णालयांची निवड करण्यात येईल. या रुग्णालयामध्ये एसटी कर्मचाऱ्यांची बिले महामंडळ देय करणार आहे. त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, वेतन वाढीचा दराची थकबाकीबाबत ३० नोव्हेंबरपूर्वी निर्णय घेण्यात येईल.

# ग्रामीण विकास कामाकरिता १ कोटी व तांडा वस्ती विकास कामाकरिता २ कोटी निधी मंजूर

## विधानसभा प्रमुख इंजि.रमेश राजूरकर यांच्या प्रयत्नाला यश

**वरोरा । प्रतिनिधी**





वरोरा व भद्रावती विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण विकास करणे हा एकमेव ध्येय मनाशी बाळगून राजकारण करणारे, दूरदर्शी दृष्टीक्षेप ठेवणारे, पहिले समाजकारण व नंतर राजकारण या भाजपाच्या ध्येय धोरणाला जपणारे इंजि. रमेश राजूरकर विधानसभा प्रमुख, यांच्या प्रयत्नाला यश प्राप्त होऊन वरोरा व भद्रावती विधानसभा अंतर्गत ग्रामीण विकास कामाकरिता १ कोटी निधीची शासनातर्फे विकास कामे मंजूर करुन घेतलेली आहे.कोणत्याही राजकीय वारसा नसतांना व प्रशासकीय कामाची पार्श्वभूमी असल्याने कामाचा सतत पाठपुरावा करून शासनाकडून ग्रामीण विकास कामाकरिता १ कोटी व तांडा वस्ती विकास कामाकरिता २ कोटीपर्यंतचा भरघोस निधी उपलब्ध करून घेतला व विकास कामाचा नवीन पर्वास सुरुवात केली, त्यांच्या या प्रयत्नामुळे आता वरोरा तालुक्या अंतर्गत मौजा नागरी, मौजा आब वडगाव, मौजा बोर्ड, मौजा देहेगाव व मौजा भटाळा येथे सिमेंट रोडचे बांधकाम तसेच मौजा सालोरी येथे रस्त्याचे डांबरीकरण आणि भद्रावती तालुक्या अंतर्गत मौजा पानवडाळा व डोंगरगाव (खडी) येथील सिमेंट रोडचे व नाली बांधकाम असे महत्त्वाचे काम यामध्ये मंजूर करण्यात आले आहे. तसेच वरोरा भद्रावती विधानसभा अंतर्गत येणाऱ्या तांडा वस्तीकरिता २ कोटी पर्यंतचा भरघोस निधी सुद्धा शासनामार्फत मंजूर करून घेतलेला आहे.

# पालकमंत्री देवेंद्र फडणवीस परत या- जबाबदारी झेपत नसेल तर राजीनामा द्या

## गडचिरोली जिल्हा काँग्रेसचे डफरी बजाव आंदोलन





**गडचिरोली । प्रतिपिधी**

राज्याचे उपुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री आहे. राज्याचे उपुख्यमंत्री असताना आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री असताना देखील देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली सारख्या मागास आणि दुर्गम जिल्ह्याचे पालकत्व स्वताहून स्वीकारले.मात्र आता विविध समस्यांनी जिल्ह्यातील जनता, महीला, विद्यार्थी युवक त्रस्त आहे.फडणवीस यांच्या कडे ऊर्जा खाते असताना देखील शेतीला नियमित वीज पुरवठा मिळत नाही. रानटी हत्ती आणि वाघाच्या धुमाकुळीमुळे जिल्ह्यातील शेतकरी त्रस्त आहे. प्रशासकीय अधिकारी जिल्ह्याचे मालक असल्या प्रमाणे वागत आहे.मात्र पालकमंत्री फडणवीस यांचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष असून मागील अनेक महिन्या पासुन फडणवीस यांनी जिल्ह्यात दौरा केलेला नाही. अश्या निद्रावस्थेत असलेल्या पालकमंत्र्याला जागे करण्याकरीता काही दिवसाआधी गडचिरोली जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांनी पत्र लिहून पालकमंत्र्यांनी किमान जिल्ह्यात दिवाळीच्या फराळा करीता तरी यावे असे निमंत्रण दिले होते. मात्र पालकमंत्र्याच्या दौऱ्याची अजूनही काही चाहूल न लागल्याने परत गडचिरोली जिल्हा काँग्रेसच्या वतीने पालकमंत्री फडणवीस गडचिरोली जिल्ह्यात परत या - जबाबदारी झेपत नसेल तर राजीनामा दया म्हणत जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांच्या नेतृत्वात इंदिरा गांधी चौकात डफरी बजाव आंदोलन करण्यात आले.

यावेळी प्रदेश सचिव डॉ. नितीन कोडवते, प्रदेश सचिव डॉ. चंदाताई कोडवते, जि.प. माजी उपाध्यक्ष मनोहर पा. पोरेटी, जि.प. माजी उपाध्यक्ष तथा कुरखेडा तालुकाध्यक्ष जीवन पा. नाट, शहर अध्यक्ष सतीश विधाते, युवक काँग्रेस प्रदेश सचिव विश्वजित कोवासे, गडचिरोली तालुकाध्यक्ष वसंत राऊत, आरमोरी तालुकाध्यक्ष मिलंद खोब्रागडे, ओबीसी सेल कार्याध्यक्ष दिवाकर निसार, किसान सेल अध्यक्ष वामनराव सावसाकडे, परिवहन सेल अध्यक्ष रुपेश टिकले, शिक्षक सेल अध्यक्ष दत्तात्रय खरवडे, ग्राहक सेल अध्यक्ष भारत येरमे, माजी नगरसेवक रमेश चौधरी, प्रभाकर वासेकर, शंकरराव सालोटकर, नेताजी गावतुरे, हरबाजी मोरे, भैय्याजी कत्रौजवार, बंडोपंत चिटमलवार, गिरीधर तीतराम, सुभाष धाईत, सुरेश भांडेकर, ढिवरू मेश्राम देवाजी नैताम, सुदर्शन उंदीरवाडे, मोरेश्वर मांडाळे, लालाजी बावणे, आनंदराव खोब्रागडे, दिवाकर दुर्गे, परशुराम गेडाम, विठ्ठल लाटीवार, प्रफुल किन्नाके, हरिश्चंद्र हिवरकर, नरेंद्र खोब्रागडे, उत्तम ठाकरे, योगेंद्र झंजाळ, लालाजी सातपुते, श्रीकांत काथोटे, चोखाजी भांडेकर, शालिक पत्रे, निखिल खोब्रागडे, नामदेव आत्राम, गोपाल कविराज, गजेंद्र बिश्वास, संदीप भैसारे, देवेंद्र बांबोळे, आय बी शेख, कुंदन झाडें, श्रीरंग कोराम, हरिश्चंद्र हिवरकर, रोशन कोहळे, जावेद खान सह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या शिष्टाईला यश

# उपोषणकर्त्यांनी उपोषण सोडलं ;मागणी लवकरच पूर्ण करण्याचे दिले आश्वासन

**सिरोंचा । प्रतिपिधी**



सिरोंचा तहसील कार्यालया समोर गेल्या सात दिवसांपासून शेतकऱ्यांचे विविध मागण्यांना घेऊन उपोषण सुरू होते.याची माहिती मिळताच ८ नोव्हेंबर रोजी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी शेतकऱ्यांच्या उपोषण स्थळास भेट दिली.सिरोंचा तालुक्यातील नारायणपूर, मेडाराम, आदीमुत्तापूर, नंदीगाव, लक्ष्मीपूर, व अमरावती या गावातील शेतकऱ्यांचे शेतीचे लोडशेडिंग बंद करण्यात यावे या मागणीसाठी सिरोंचा येथील तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसलेल्या शेतकऱ्यांची माजी राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी भेट घेऊन उपोषणकर्त्यांशी बराच वेळ सकारात्मक चर्चा केली.यावेळी शेतकऱ्यांनी विविध मागण्यांचे निवेदन ही राजे अम्ब्रिशराव आत्राम यांना दिले.आणि त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या व लवकरच या समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.गेल्या एक वर्षांपासून महावितरण कंपनीकडून नारायणपूर भागात भारनियमन प्रक्रिया सुरू आहे. दिवसातून केवळ ८ तास विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. यामुळे मेडाराम, नारायणपूर, आदीमुत्तापूर, नंदीगाव, लक्ष्मीपूर, व अमरावती या गावातील शेतकऱ्यांच्या शेतीत पाणी पुरवठा वेळेवर होत नाही. या भागातील शेतकऱ्यांच्या धान,मिरची, कापूस इत्यादी पिकांची मोठया प्रमाणात नुकसान होत आहे.लोडशेडिंग बंद करून २४ तास विद्युत पुरवठा देण्याची मागणी संबंधित विभागाला शेतकऱ्यांनी अनेकदा करूनही लोडशेडिंग प्रक्रिया बंद करण्यात आली नाही.यामुळे मागणी पुर्ण होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी केला होता. परंतु माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी शेतकऱ्यांच्या उपोषण मंडपात जावून शेतकऱ्यांना तुमच्या मागण्या मी उपमुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मी स्वतः भेट घेऊन पाठपुरावा करून लवकरच शेतकऱ्यांचे सर्व मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.यावेळी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी आश्वासन दिल्याने आंदोलकांचे समाधान झाले ह्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले, माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचा हस्ते उपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांना निंबु पाणी पाजून हे आंदोलन संपविले.यावेळी जितेंद्र शिकतोळे तहसीलदार सिरोंचा यांनी सुद्धा परिश्रम घेतला व सिरोंचा तालुक्यातील विविध भागातील शेतकरी व स्थानिकांची तथा भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विदर्भ आंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली अजय कंकडालवार यांची भेट

**अहेरी । प्रतिपिधी**

आविसं अजय मित्र परिवारचे विदर्भ नेते व लोकप्रिय माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या अहेरी येथील निवासस्थानी विदर्भ आंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन.विदर्भ आंदोलना बाबत पदाधिकाऱ्यांनी चर्चा करून.विदर्भ राज्य आंदोलना बाबतीत माहिती देऊन.विदर्भाचा ७/१२ पुस्तक भेट देण्यात आले.यावेळी विदर्भ आंदोलन समितीचे अध्यक्ष वामनराव चटप,मुकेश मासूरकर,युवा आघाडी अध्यक्ष तात्यासाहेब,माजी जि.प.सदस्य अजय नैताम,अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडसेलवार,राकेश सडमेकसह विदर्भ आंदोलन समितीचे पदाधिकारी तसेच आविसं अजय मित्र परिवारचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



## संपादकीय

# प्रदूषणाच्या राजधान्या!



रामचरितमानसात संत तुलसीदासांनी शरद ऋतूचे मोठ्या गोड शब्दांत कौतुक केले आहे. 'बरखा बिगत सरद ऋतु आई। लछिमन देखहु परम सुहाई,' अर्थात, 'लक्ष्मणा, पाहा! वर्षाराणी वृद्ध झाली, तिच्या वृद्धत्वाचे पुरावे जणू कास फुलांचे शुभ्र केसच देत आहेत, आणि सुहावना असा शरद ऋतू अवतरला आहे', असे वर्णन रामचरितमानसात येते.भारतीय संस्कृती आणि साहित्यात शरदाच्या महिम्याचे हे चांदणे अगदी टिपूर पडले आहे, असे म्हणता येईल. गूढरम्य चांदण्या रात्री, आणि मंद समीरण लहरींनिशी मौसम सुहाना करणारा हा ऋतुराज यंदा मात्र पुरता काळवंडून गेलेला दिसतो. हे शरदाचे दिवस आहेत, यावर विश्वास बसणार नाही, अशी हवा सध्या सर्वदूर पडली आहे. देशातली बहुतेक सर्व प्रमुख शहरे प्रदूषण आणि खराब हवामानामुळे गुदमरून आहेत. आभाळ ढगाळ आणि उदासवाणे झाले आहे, आणि चांदण्याचा तर कुठे पत्ताच नाही.सर्वत्र प्रदूषित हवेचे थर तरंगत आहेत. हवेत दिसतो तो धुरांचा काळवंडलेपणा आणि एकप्रकारचा शिळेपणा. या वाईट हवामानात राजधानी दिल्ली पार गुदमरली. वाहनांनी ओकलेला धूर, अनिर्बंध कारखाने, वेगाने उभी राहणारी बांधकामे आणि त्यात शेतातला राब जाळण्याचे दिवसअशा अनेक कारणांमुळे दिल्लीची हवा बिघडली. दिल्लीतल्या हवेचे काय करायचे, यावर कोर्टकज्जे सुरु असतानाच आता पाठोपाठ मुंबई-पुण्याच्या हवेनेही आपला ठाव सोडल्याचे दिसून येत आहे. बंगळूर, चेन्नईसारखी महानगरेही प्रदूषणग्रस्त आहेत. ऐन दिवाळीच्या तोंडावर सर्वत्र दमा आणि खोकल्याने बेजार झालेली माणसे दिसू लागली आहेत. साऱ्यांचा श्वास एकाच वेळी असा कोंडण्याचे कारण काय असावे? उत्तर शोधायला गेले तर प्रश्नच अधिक हाताला लागतात.त्यात भर पडली आहे ती सध्या थंडावलेल्या वाऱ्यांची. संपूर्ण देशात फारसे वारेच वाहेनासे झाल्याने हवेतील प्रदूषक आणि धूलिकण खालच्या स्तरावरच तरंगत राहिल्याने ही परिस्थिती चिघळली. एरवी हे वारे फार संजीवक असतात. समुद्राचा शेजार लाभलेली मुंबई तर या वाऱ्याच्या हालचालीमुळेच तग धरुन असते. एरवी दीड कोटी लोकसंख्येचे हे महानगर सपशेल गुदमरुन गेले असते. घनदाट लोकसंख्या, वाहनांची बेसुमार गर्दी, धूर ओकणारे उद्योगधंदे, प्रदूषणप्रतिबंधक कायद्यांचे उल्लंघन अशा कितीतरी कारणांमुळे मुंबई रहिवासास अयोग्य ठरली असती. परंतु, नेमाने वाहणारे वारे न चुकता मुंबईची दूषित हवा वाहून नेतात. नव्या ताज्या हवेचा रतीब घालत राहतात. सध्या हे वारेच, असंतुष्ट सफाई कामगारांप्रमाणे संपावर गेले आहेत.पुणेकरांना तर आपल्या शहरातील हवेचा अभिमान वाटत असे. गेल्या काही वर्षात हा लौकिक लयाला गेल्यात जमा आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही शहरे आता प्रदूषित हवेची शहरे ठरताहेत. शहरांची नियोजनशून्य वाढ, दर्जेदार सार्वजनिक वाहतुकीच्या अभावामुळे बेसुमार खासगी वाहनसंख्या, मेट्रोपासून महत्त्वाच्या रस्त्यांच्या डागडुजीपर्यंत अनेक विकासकामे एकाच वेळी सुरू झाल्याने सर्वत्र गोंगाट आणि प्रदूषण यामुळे पुण्याची स्थिती अक्षरशः दयनीय झाली आहे. या शहरातील बांधकामांचा वेगही धडकी भरवणारा आहे. विद्येचे माहेरघर मानले जाणारे पुणे सध्या प्रदूषणाचे पाळणाघर झाले आहे.हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी प्राय: एअर क्वालिटी इंडेक्स (-टख) हे संख्यात्मक प्रमाण वापरले जाते. त्यानुसार पुण्याची हवा १६१ निर्देशांकापर्यंत गेली. मुंबईत हेच प्रमाण १४५ पर्यंत दिसून आले, तर दिल्लीच्या हवेतला बिघाड काही दिवसांपूर्वी ४०२ निर्देशांकापर्यंत मोजला गेला. सर्वसाधारणपणे १०० निर्देशांकापर्यंतची हवा 'बरी' मानली जाते. या वेगाने पुण्याची हवा घसरत गेली तर ती दिल्लीशीही स्पर्धा करु लागेल, अशी भीती आहे.दिल्ली प्रशासनाने तातडीचा उपाय म्हणून सम-विषम क्रमांकाची वाहने एक दिवसाआड रस्त्यावर उतरवणे, शाळांना सुट्या देणे, बांधकाम ढिगाऱ्यांची ने-आण करणारी वाहने काही काळ बंद ठेवणे, असे प्रयत्न हाती घेतले आहेत. कृत्रिम पद्धतीने पाऊस पाडून धूलिकण खाली बसवावेत, असेही दिल्ली सरकारने केंद्राला सुचवले आहे. असलेच काही उपाय मुंबईतही लागू करण्यात आले असून पुण्यात तर एन-९५ सारखे सुरक्षित मास्क वापरण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. अर्थात यातले कुठलेच प्रयत्न पुरेसे नाहीत, हे उघड आहे. 'आधी जागे का झाला नाहीत? ही महानगरांची हत्याच आहे' असे जळजळीत उद्गार मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना काढावे लागले.ते अजिबात अतिशयोक्त मानता येणार नाहीत. नेमकी दिवाळी तोंडावर आलेली असताना आता असल्या हवेत फटाक्यांची भर पडणार आहे. 'बेरियम' या जहरी रसायनाचा उपयोग करुन तयार करण्यात आलेल्या फटाक्यांवर सर्वोच्च न्यायालयाने देशभरात बंदी आणली आहे, ते योग्यच आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही दिवाळीत फक्त सायंकाळी सात ते १० या वेळेत फटाके वाजण्याची अनुमती दिली आहे. नागरिकांनी यास निर्बंध न मानता कर्तव्य मानायला हवे. आधीच प्रतिकूल बनलेल्या परिस्थितीत निदान आपण मानवनिर्मित भर नको घालायला, एवढा विवेक बाळगला, तरी पुष्कळ झाले. पुढील पिढ्यांनी शारदीय सौंदर्याचा आनंद लुटावा, असे वाटत असेल तर आज नियम पाळायलाच हवेत.

# निर्मल येथे खासदार अशोक नेते यांच्या नेतृत्वात बैठक संपन्न

**गडचिरोली | प्रतिपिधी**

तेलगांना राज्यातील जिल्हा निर्मल येथील निर्मल क्षेत्राचे उमेदवार मान.माहेश्वर रेड्डी यांच्या निवासस्थानी भाजपा संघटनेची महत्वपुर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकिचे आयोजन निर्मल जिल्ह्याचे निवडणूक प्रमुख महाराष्ट्र राज्याचे खासदार अशोक नेते यांच्या नेतृत्वाखाली व निवडणूक प्रभारी आमदार नामदेव ससांणे व आमदार केशव प्रसाद यांच्या उपस्थितीत संपन्न झाली .भाजपा अनु. जनजाती मोर्चा चे राष्ट्रीय महामंत्री तथा खासदार अशोक नेते यांना तेलंगणा राज्यांत निर्मल जिल्ह्यातील निर्मल, खानापुर, मुधोल या क्षेत्राची महत्वपुर्ण जबाबदारी दिल्याने या क्षेत्रात भारतीय जनता पार्टी चा कसा विजय होईल.या तिन्ही विधानसभा कशा जिंकता येईल,यासाठी भाजपा पदाधिकारी, बुथ प्रमुखांना दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडावी.याकरीता भाजपा पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे.असे आवाहन करत निवडणूक नियोजन, व्यवस्थापन, संबंधित मार्गदर्शन केले.याप्रसंगी भारतीय जनता पार्टीवर विश्वास ठेऊन मोठ्या संख्येनी युवक वर्गानी व महिला भगिनींनी भाजपा चा दुपटा टाकुन भाजपा मध्ये पक्ष प्रवेश केला.



या प्रसंगी प्रामुख्याने जिल्हा निर्मलचे प्रभारी जिल्हा महामंत्री मेडीसेमे राजू,विस्तारक विलास गादे,आयना गहारी बोमया आदिलाबाद विधानसभा प्रमुख,भुपती रेड्डी,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष रजनी वैद्य,अलवेली मंगा तसेच भाजपा पदाधिकारी, आघाडी या सह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# स्वतंत्र विदर्भ राज्य आंदोलन समिती च्या पदाधिकाऱ्यानी माजी आमदार दिपकदादा आत्राम यांची घेतली भेट



**अहेरी | प्रतिपिधी**

स्वतंत्र विदर्भ राज्य आंदोलन समितीचे नेते तथा माजी आमदार वामनराव चटप यांनी आलापल्ली येथे भारत राष्ट्र समितीचे नेते,आविस विभागीय अध्यक्ष तथा माजी आमदार दिपकदादा आत्राम यांच्या घरी भेट देत २२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विदर्भ निर्माण संकल्प मेळाव्याला उपस्थित राहून आंदोलनात सहभागी होण्यासाठी निमंत्रण दिले.माजी आमदार वामनराव चटप यांनी बोलतांना पुढे म्हटले की आपण विद्यार्थी दशेपासून आंदोलन करून वेगळा विदर्भाची मागणी करत आहात म्हणून आता होणाऱ्या आंदोलनात आपण सक्रिय सहभाग घेण्याची वेळ आली आहे,आंदोलनाशिवाय विदर्भ वेगळा होणे नाही.त्या सोबतच अहेरी उपविभागातील समस्यांवर चर्चा करण्यात आली.यावेळी माजी आमदार दिपकदादा आत्राम यांनी आंदोलनात सहभागी होण्याचे आस्वासन देऊन होणाऱ्या विदर्भ निर्माण संकल्प मेळाव्यासाठी आर्थिक मदत दिली .सदर भेटी दरम्यात माजी आमदार वामनराव चटप यांच्या सोबत मुकेश मासुरकर,तात्यासाहेब मत्ते,अशोक पोरेड्डीवार, विलास रापर्तीवार,मोतीराम लाटेलवार,दिनकर लाकडे उपस्थित होते.

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर ज्ञानेश्वर डुकरे यांची निवड

**भद्रावती अहेरी**

जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडून ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची निवड करण्यात आली. त्यात भद्रावती येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर डुकरे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी जिल्हास्तरावर ग्राहक संरक्षण परिषदेची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार निवड समितीमार्फत जिल्हा संरक्षण परिषदेवर जिल्ह्यातील एकूण १७ सदस्यांची निवड करण्यात आली. या समितीत भद्रावती येथील ज्ञानेश्वर डुकरे यांचा समावेश आहे. श्री डुकरे यांना समाजसेवेची आवड असून विविध सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राशी त्यांचा निकटचा संबंध आहे. या निवडीबाबत बोलतांना त्यांनी सांगितले की, समाजसेवा हा माझा पिंड आहे. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर माझी निवड करण्यात आली. हे जबाबदारीचे पद



आहे. माझी जबाबदारी ओळखुन मी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीन.या निवडीबद्दल स्तंभलेखक डॉ.यशवंत घुमे, सुनील बिपटे, अशोक पोतदार, सुनील पतरंगे, ईश्वर शर्मा तथा अनेकांनी शुभेच्छा दिल्या.तालुक्यात सर्वत्र त्यांचे अभिनंदन केल्या जात आहे.

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर प्रवीण चिमूरकर यांची निवड

**भद्रावती | अहेरी**

जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी नुकतीच ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची निवड केलेली आहे. त्यात भद्रावती येथील अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सहसचिव प्रवीण चिमूरकर यांची ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी म्हणून जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर सदस्य म्हणुन निवड करण्यात आली.



सोबतच ज्ञानेश्वर डुकरे यांची कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य तर दत्तात्रय गुंडावार यांची शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणुन निवड करण्यात आली.ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९ नुसार ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी जिल्हास्तरावर ग्राहक संरक्षण परिषदची तरतुद केली आहे. त्यानुसार ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता दि. ८ नोव्हेंबर ला निवड समिती मार्फत जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर एकुण १७ सदस्यांची निवड करण्यात आली. सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असलेले, ग्राहकांच्या हक्कासाठी लढा देणारे प्रवीण चिमूरकर हे अखिल भारतीय ग्राहक पंचायत भद्रावती चे सहसचिव आहेत. पुरोगामी पत्रकार संघ, भद्रावतीचे अध्यक्ष आहेत. त्यांनी ग्राहकांच्या अनेक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतलेला असून, ग्राहक सेवेसाठी ते तत्पर आहेत.निवड झाल्याबद्दल प्रवीण चिमुरकर यांचे अखिल भारतीय ग्राहक पंचायत भद्रावतीचे अध्यक्ष वामण नामपल्लीवार, पुरूषोत्तम मत्ते, वसंत वर्हाटे, अशोक शेंडे, सुदर्शन तनगुलवार तसेच पुरोगामी पत्रकार संघाचे डॉ. ज्ञानेश हटवार, मनोज मोडक, आशीष कोटकर, शिरीष उगे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. सामाजिक क्षेत्रात नेहमीच कार्यरत असलेले प्रवीण चिमूरकर यांचे निवडीबद्दल अनेक सामाजिक संघटनेच्या वतीने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**माझ्या निवडीचे खरे श्रेय अखिल भारतीय ग्राहक पंचायत भद्रावतीचे वामण नामपल्लीवार, पुरूषोत्तम मत्ते, वसंत वर्हाटे, अशोक शेंडे यांना जाते. त्यांनी नेहमी माझ्या पाठिशी उभे राहीले, माझ्यावर विश्वास ठेवला त्यामुळे हे शक्य झाले. मी भविष्यात ग्राहकांच्या हक्क, अधिकारांसाठी सतत काम करत राहील.**

**प्रवीण चिमूरकर**
**जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद, सदस्य तथा अखिल भारतीय ग्राहक पंचायत, सहसचिव**

# राजकीय पुढारी मराठा,धनगर व इतर समाजाच्या मागण्यांचे राजकारणात करीत आहे; सोबतच कलाल-कलार समाजाच्या पारंपरिक(मद्य) व्यवसायाचे सुध्दा राजकारण होत आहे

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

आज प्रत्येक राजकीय पक्ष आपली पोळी शेकण्याचे काम करीत असल्याचे दिसून येते.यामध्ये सर्वसामान्य समाज व मागासलेला समाज भरडल्या जात आहे.आज मराठा समाज, धनगर,कलाल-कलार, हलबा इत्यादी अनेक समाज वाढती बेरोजगारी व आपल्या हक्काची लढाई लढत तेही देश स्वतंत्र झाल्यानंतर ही गंभीर बाब आहे.परंतु प्रत्येक राजकीय पुढारी व पक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी सर्वसामान्यांचा बळी घेत आहे.आज जरांगे पाटील उपोषणाला का बसले याचाही सर्वंच राजकीय पुढाऱ्यांनी विचार करण्याची गरज आहे.आता राजकीय पक्ष व पुढाऱ्यांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की यापुढे प्रत्येक समाजात अनेक जरांगे पाटील तयार होतील यात दुमत नाही.कारण राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःचे हित साधण्यासाठी संपूर्ण जातीधर्मामध्ये व समाजामध्ये जहर घोळण्याचे काम केले आहे.आज मराठा समाज जेव्हा आरक्षणाची मागणी करीत आहे तर सरकार निजाम काळीन पुरावे मागत आहे.जरांगे पाटलांनी पुन्हा उपोषण सुरू केले तर सरकारमध्ये जनुकाय भुकंप आला की काय असे चित्र दिसुन आले व सरकारने तत्काळ कुणबी नोंदी शोधण्यासाठी मराठवाड्यात राबवलेली मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३ नोव्हेंबर २०२३ रोज शुक्रवारला विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिले व यासाठी विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे निर्देश सरकारने दिले.ह्या संपूर्ण घटना जरांगे पाटील यांच्या उपोषणामुळे सरकार धास्तावले.असाच रीतसर विचार राज्यातील संपूर्ण समाजाचा व्हायला हवा मग तो कोणताही समाज असो.इतर समाजाप्रमाणे सरकार गेल्या ७६ वर्षांपासून कलार-कलाल समाजावर सरकार अन्याय करीत आहे. ही बाब सरकार चांगल्याप्रकारे ग्यात आहे की कलाल-कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय मद्य विकने होता आणि आहे.परंतु याच राजकीय पुढाऱ्यांनी व पुंजीपतींनी स्वतःच्या स्वार्थासाठी कलार-कलाल समाजाचा विश्वासघात केला व बळी घेतला आणि कलाल-कलार समाजाला आपल्या पारंपरिक व्यवसायापासुन कोसोदुर लोटले.सरकार मराठ्यांच्या आरक्षणाबद्दल जशी तत्परता दाखवित आहे तशीच तत्परता इतर समाजासाठी सरकार का दाखवित नाही? सरकारला कोणता समाज कीती व कोणत्या समाजाची कीती ताकद आहे हे जर पहायचे असेल तर सरकारने ताबडतोब जातिनिहाय जनगणना करने गरजेचे आहे.राज्यातील मराठा समाज असो वा अन्य समाज त्यांच्या हक्काच्या मागण्या सरकार डावलू शकत नाही.सरकाने कोणत्याही समाजाची मागणी पूर्ण करतांना इतरही समाजांचा गांभिर्याने विचार करायला हवा अन्यथा राज्यात दुफाळी माजेल.सरकारने कोणत्याही समाजाचा विचार करतांना कोणाच्याही दबावाखाली न येता काम केले पाहिजे.आपण पहातो की राज्यातील कोणत्याही गोष्टीचा मार्ग काढण्यासाठी संपूर्ण राजकीय पक्ष व पुढारी एकत्र येत नाही ही सर्वात मोठी खंत आहे.येणाऱ्या निवडणूका पहाता कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांनी फोल आश्वासने देऊ नये.परंतू जो-जो समाज आपल्या हक्कांसाठी लढत आहे त्याचा हक्क त्याला देण्याचे प्रथम कर्तव्य सरकारचे आहे.त्यामुळे सरकारने गेल्या ७६ वर्षांपासून कलार-कलाल समाजाचा हिरावलेला पारंपरिक (मद्य) व्यवसाय कलाल-कलार समाजा परत करायलाच पाहिजे यातच सरकारचे हित आहे.कलार-कलार समाजाची एकच मागणी आहे ती म्हणजे एकतर सरकारने संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदी लागू करावी अन्यथा ५० टक्के दारूचे परवाने कलाल-कलार समाजाला परत करावे.कारण कलाल-कलार समाजाचा मद्य विक्री हा पारंपरिक व्यवसाय आहे.त्याचप्रमाणे सरकारने मराठा समाजाला आरक्षण देतांना ओबीसीच्या आरक्षणामध्ये ढवळाढवळ करू नये.सरकार मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी आरक्षणात एन्ट्री होत असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चा दिसून येते.यामुळे ओबीसी विरूद्ध मराठा असा वाद निर्माण होवू शकतो.त्यामुळे मराठा समाजाला वेगळे आरक्षण देवून समाधान पुर्वक निर्णय घ्यावा जेणेकरून पुन्हा वाद निर्माण होवू नये.सध्या राजकीय पुढाऱ्यांच्या वर्चस्वाची लढाई सुरू आहे यात सर्वसान्य समाज भरडल्या जाणार नाही याचीही दक्षता सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी व महाराष्ट्रातील घडामोडीवर केंद्राने सुध्दा नजर ठेवावी.

# शेतकऱ्यांसाठी पूर्ण शक्तीने काम करणार : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

## आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत सहजतेने पोहचविण्याचे निर्देश एकार्जुना येथे शेतकरी - शास्त्रज्ञ मेळावा व शिवार फेरीचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारताचे माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान, जय किसान' हा नारा दिला होता. जीवाची पर्वा न करता सीमेवरील जवान भारतमातेची सेवा करीत आहेत, तर कठोर परिश्रम करून शेतकरी शेतामध्ये धान्य पिकवित आहे. शेतकरी सुखी झाला तरच देश सुखी होईल. त्यामुळे मातीच्या गर्भात अन्नधान्याची निर्मिती करणा-या शेतक-यांसाठी पूर्ण शक्तीने काम करणार असल्याची ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.





वरोरा तालुक्यातील एकार्जुना येथील कृषी संशोधन केंद्रात शेतकरी - शास्त्रज्ञ मेळावा आणि शिवार फेरीचे उद्घाटन करतांना ते बोलत होते. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, कापूस उत्कृष्टता प्रकल्प, कृषी संशोधन केंद्र एकार्जुना, कृषी विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंचावर पं.दे.कृ. वि. कुलगुरू डॉ. शरद गडाख, डॉ. विलास खर्चे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. प्रमोद यादगीरवार, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरळकर, एकार्जुना येथील प्रकल्प प्रमुख डॉ. श्रीकांत अमरशेट्टीवार, देवराव भोंगळे, रमेश राजुरकर, नामदेव डाहुले, नरेंद्र जीवतोडे, भगवान गायकवाड आदी उपस्थित होते.शेती हा व्यवसाय मजबुतीचा व्हायला पाहिजे, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, काबाडकष्ट करून शेतीतून मिळणारा आनंद आणि अर्थाजन आजही कमी पडते. त्यामुळे मेहनतीच्या तुलनेत दर्जेदार उत्पादन वाढवून शेतक-यांना आर्थिक लाभ होण्यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आजही शेती व्यवसायातूनच सर्वाधिक रोजगार निर्मिती होत असली तरी देशाच्या जीडीपीमध्ये शेतीचा वाटा कमी आहे. त्यामुळे शेतकरी उत्पादक कंपन्यांना आर्थिक मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना घेऊन जिल्ह्यात 'मिशन जयकिसान' राबविण्यात येत आहे. पुढे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, कृषी विद्यापीठाने मूल येथील कृषी महाविद्यालयाच्या कामाला गती द्यावी. केवळ इमारत बांधून नाही तर कृषी तंत्रज्ञानाच्या बाबतीत हे महाविद्यालय दीपस्तंभ व्हावे, यासाठी प्रयत्न करावे. ख-या गरजू शेतक-यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहचविण्यासाठी विद्यापीठाने संशोधन आणि तंत्रज्ञानात सुलभता आणावी. आज जवळपास सर्वांकडे स्मार्ट फोन आहेत. त्यामुळे त्याचा योग्य उपयोग करून डीजीटल माध्यमातून शेतीचे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचवा, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.प्रास्ताविक करतांना डॉ. विलास खर्चे म्हणाले, एकार्जुना येथे १९७४ पासून कृषी संशोधन केंद्र कार्यरत आहे. तसेच गत वर्षापासून येथे कपाशी उत्कृष्टता केंद्र सुरू झाले आहे. कपाशीचे प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण देणे, हा यामागचा उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले. तर अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. गडाख म्हणाले, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा विस्तार विदर्भातील ११ जिल्ह्यात असून या अंतर्गत १९ संशोधन केंद्र, ३८ महाविद्यालये, १४ कृषी विज्ञान केंद्र कार्यरत आहे. विद्यापीठाने आतापर्यंत १२० पिकांवर संशोधन केले असून १८१ वाण विकसीत केले आहेत. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकार्जुना येथील कृषी संशोधन केंद्रासाठी ३ कोटी ७ लक्ष रुपये उपलब्ध करून दिले आहेत. तसेच पालकमंत्र्यांच्या पुढाकारानेच मूल येथील कृषी महाविद्यालय उभे राहत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते कापूस व्यवस्थापन घडीपुस्तिकेचे विमोचन तसेच मनोहर किरटकर, बळीराम गायकवाड, चेतन ठाकरे, कुसूम किन्नाके या शेतक-यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.जिल्ह्यात ५००३ किलोमिटर चे पाणंद रस्ते : शेतक-यांना त्यांचा शेतमाल घरापर्यंत नेण्यासाठी गावागावात पाणंद रस्ते करण्याचे नियोजन करण्यात आले असून पुढील दीड ते दोन वर्षात जिल्ह्यात एकूण ५००३ किलोमिटर चे पाणंद रस्ते तयार करण्यात येणार आहे. याबाबत गावागावात जनजागृती करावी. जेणेकरून अतिक्रमण असणारे पाणंद रस्ते मोकळे करण्यास मदत होईल. गावक-यांनी पाणंद रस्ते अडविणा-यांची समजूत घालावी तसेच जास्तीत जास्त पाणंद रस्ते करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.शेतक-यांच्या हितासाठी अनेक योजना कार्यान्वित : शेतकरी सन्मान योजनेंतर्गत केंद्र सरकारच्या ६ हजार रुपयांप्रमाणेच राज्य सरकारकडूनही अतिरिक्त ६ हजार रुपये, असे एकूण १२ हजार रुपये शेतक-यांना देण्यात येत आहे. राज्य शासनाने १ रुपयांत पीक विमा उपलब्ध करून दिला असून राज्यातील १ कोटी ६९ लक्ष शेतक-यांचा २५५१ कोटी रुपयांचा विमा सरकारने भरला आहे. स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत आता सानुग्रह अनुदान स्व रूपात योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत सातबारा असलेल्या संपूर्ण कुटुंबालाच विम्याचे संरक्षण देण्यात आले आहे. तसेच या योजनेत आता शेतमजूर यांना सुध्दा समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.कृषी अधिका-यांवर कौतुकाची थाप : जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार आणि आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरळकर हे दोन्ही अधिकारी चांगले काम करीत असून त्यांच्याबाबत शेतक-यांच्या तक्रारी नाहीत, अशी कौतुकाची थाप पालकमंत्र्यांनी दिली. या अधिका-यांनी आणि त्यांच्या टीमने कृषी क्षेत्रात चंद्रपूर जिल्हा आदर्श करण्यासाठी आणखी जोमाने प्रयत्न करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## लोकार्पित झालेली वास्तु विद्यार्थ्यांसह जेष्ठांसाठी उपयुक्त ठरेल-आ.जोरगेवार

### अभ्यासिकेच्या इमारतीचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मतदारसंघात गरिब गरजु विद्यार्थ्यांसाठी ११ अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प केला होता, आज यातील एका अभ्यासिकेच्या इमारतीचे लोकार्पण करतांना आनंद होत आहे. येथे अभ्यासिकेचे साहित्य खरेदीसाठी लवकरच आपण निधी उपलब्ध करुन देणार आहोत. आजचा हा लोकार्पण कार्यक्रम आमच्या संकल्पपुर्तीकडील पाऊल असून लोकार्पित झालेली ही वास्तु विद्यार्थ्यांसह समाजातील ज्येष्ठ नागरिकांसाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.




आमदार निधीतून २५ लक्ष रुपये खर्च करत तुकुम येथील पसायदान ज्येष्ठ नागरिक संघ येथे तयार करण्यात आलेल्या अभ्यासिकेच्या इमारतीचे आज गुरुवारी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला पसायदान ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाशराव गुंडावार, उपाध्यक्ष कुसन नागोसे, सचिव दादाजी नंदनवार, सहसचिव देवराव कोटकर, माजी नगरसेवक संदिप आवारी, दिपक तमिवार, ॲड. एम एम सातपुते, ॲड. शेख सत्तार, नथ्थु मत्ते, हिरामण भोवते, रमेश लखमापूरे, श्रावण नन्नावरे, पसायदान योग नृत्य परिवारच्या वनश्री मेश्राम आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, ज्येष्ठ नागरिक संघात येऊन जेष्टांचा आर्शिवाद घेण्याचे वारंवार सौभाग्य मला मिळत आहे. येथे आल्यावर नवी उर्जा मिळते, जेष्टांच्या अनुभवातून आलेले समजा उपायोगी विचारांचा संचार येथून होतो. आपले विचार समाजासाठी उपयोगाचे आहे. ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या मागण्या पुर्ण करण्यासाठी माझे नेहमीच प्रयत्न राहिले आहे. त्यात यशही आले याचे समाधान आहे. आज येथे योगासाठी शेड तयार करण्याची मागणी आली. त्यासाठीही आपण निधी देणार असल्याची घोषणा यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली.चंद्रपूरातील युवकांमध्ये प्रतिभा आहे. येथील काही युवकांनी मिळून हायड्रोजन कारची निर्मिती केली. अशा युवकांना आपण प्रोत्साहित केले पाहिजे. अनेक गरिब कुटूंबातील युवकांमध्ये विविध प्रकारच्या प्रतिभा दडल्या आहेत. त्या आपण शोधून त्यांना संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजे. कोरोणाच्या काळात खाजगी अभ्यासिकांची फी परवडत नाही हे सांगण्यासाठी काही युवक आमच्याकडे आले होते. त्या दिवशी अशा युवकांसाठी मतदार संघात ११ अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प आपण केला होता. यातील ८ अभ्यासिकांचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. तर तिन अभ्यासिकांच्या इमारतीचे काम जवळपास पुर्ण झाले असल्याचे ते यावेळी बोलताना म्हणाले.आज लोकार्पित झालेल्या अभ्यासिकेच्या इमारतीसाठी माझे विशेष प्रयत्न सुरु होते. पसायदान ज्येष्ट नागरिक संघानेही यात मोठे सहकार्य केले आणि या एकत्रित प्रयत्नांमुळे आज येथे ही इमारत उभी राहु शकली. आता या इमारतीत अभ्यासिकेच्या साहित्यांची गरज आहे. ती पुर्ण करण्यासाठीही आपण १० लाख रुपयांचा निधी देत असल्याची घोषणा त्यांनी यावेळी बोलतांना केली. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिक व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ताडाळी एम.आय.डी.सी.स्पंज आर्यण कामगार संघटनेकडून क्रिणषा वंजारी यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ताडाळी एम.आय.डी.सी.स्पंज आर्यण कामगार संघटनेच्या वतीने गोपाणी आर्यण पावर कंपनीचे कामगार क्रिणषा महादु वंजारी यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यात आली.

क्रिणषा वंजारी यांचे दि.१६/८/२०२३ रोजी अकस्मात निधन झाले होते. त्यांचे वय ४५ वर्षे होते. ते कंपनीत २० वर्षांपासून काम करत होते. ते एक निष्ठावान आणि परिश्रमी कामगार होते. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर मोठा आघात झाला आहे.

या पार्श्वभूमीवर ताडाळी एम.आय.डी.सी.स्पंज आर्यण कामगार संघटनेने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला. संघटनेचे अध्यक्ष मा. दिनेशभाऊ चोखारे यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेच्या माध्यमातून ८२६०० रुपयांचा धनादेश त्यांच्या पत्निला दिला.यावेळी संघटनेचे अध्यक्ष मा. दिनेशभाऊ चोखारे, महासचिव संतोष बांदुरकर, कार्याध्यक्ष तुळशिराम डेरकर, उपाध्यक्ष मोहन वाघमारे, सदाशिव चतुर, सागर कन्नीरवार, दशरथ रोगे, विकास आवारी, संतोष खोब्रागडे, नंदु टोंगे, महेश जुनघरे, विजय मोरे, रमेश आरपेल्ली उपस्थित होते.या आर्थिक मदतीमुळे क्रिणषा वंजारी यांच्या कुटुंबियांना काही प्रमाणात दिलासा मिळेल, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली आहे.

## सिनाळा ग्रामवासियांना मिळाली बँकेच्या योजनांची माहिती

### जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक व बँक ऑफ इंडियाद्वारे सतर्कता सप्ताहाचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक व बँक ऑफ इंडिया, पद्मापूर शाखेद्वारा दुर्गापुर क्षेत्रातील संयुक्त ग्राम सिनाळा येथे केंद्रीय सतर्कता विभागाच्या निर्देशानुसार सतर्कता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमाला नागपूर,आरबीआयचे अग्रणी जिल्हा अधिकारी राजकुमार जयस्वाल, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रशांत धोंगडे, बँक ऑफ इंडिया पद्मापूरचे शाखा प्रबंधक अजय दुर्गे, सिनाळाच्या सरपंच सरिता नरुले, निखिल खोब्रागडे, ग्रामपंचायतचे पदाधिकारी व गावातील नागरीकांची उपस्थिती होती.आरबीआयचे अग्रणी जिल्हा अधिकारी राजकुमार जयस्वाल यांनी वित्तीय साक्षरता अभियानांतर्गत, सुरक्षित बँक व्यवहार, बचत आणि त्याचे नियोजन, मोबाइलद्वारे डिजिटल व्यवहारांमध्ये होणारी फसवणूक, अज्ञानामुळे आणि ओटीपी-पासवर्ड यासारखी गोपनीय माहिती शेअर केल्यामुळे कष्टाने कमावलेल्या भांडवलाचे आर्थिक नुकसानापासून संरक्षण करण्यासाठी संसाधनाची माहिती उपस्थितांना समजावून सांगितली.जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक प्रशांत धोंगडे यांनी केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांवर आधारित शिबिराचे आयोजन तसेच सामाजिक सुरक्षा योजनेअंतर्गत प्रधानमंत्री जनधन योजना, सुरक्षा विमा योजना, जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजनेअंतर्गत नोंदणी करणे तसेच किसान क्रेडीट कार्ड, पिक कर्ज, जनधन खाते उघडून सुरक्षा विमा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन उपस्थितांना केले. यावेळी त्यांनी बँकेच्या योजनाविषयी सविस्तर माहिती दिली.

## उपहार योजनेच्या नावाने बचत गटातील महिलांची फसवणूक

**शंकरपूर । प्रतिनिधी**

शंकरपूर तसेच परिसरातील गावां मधील बचत गटाच्या महिलांना सीआरपी व मा वि आ चे कर्मचारी बचत गटाच्या महिलांना उपहार योजने चे आमिष दाखवून व ही योजना म्हणजे स्वयंरोजगार असल्याचे सांगून हजारो रुपयांनी लुटत असल्याचा प्रकार परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू असून या समूहामध्ये गटाच्या दोन हजार महिलांची फसवणूक होत असल्याचा प्रकार सुरू आहे.




ही योजना नसून अतुल रोहनकर व त्याची पत्नी मेगा रोहनकर हे दोघेजण महिला बचत गटाच्या काम पाहणाऱ्या सीआरपी व गटाच्या कर्मचाऱ्यांकडून ड्रॉ पद्धतीने हप्त्याची वसुली करून महिलांकडून हजारो रुपये हप्त्याची जमा करतात व हप्त्याचे कांपा या ठिकाणी पांडुरंग मलोडे यांचे घरी ड्रा उघडला जातो व फक्त पाच महिलांना छोटी छोटी पाच बक्षिसे देऊन त्यांची बोळवण केल्या जाते व उर्वरित महिलांचा पैसा हा घशात घातला जातो या ठिकाणी महिलांकडून २२ हप्त्यांमध्ये लाखानी पैसा जमा करून बचत गटाच्या महिलांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केल्या जात आहे. या बचत गटाच्या महिलांना ही सरकारी योजना असे सांगून त्यांची दिशाभूल करून बक्षिसांची आमिष दाखवून त्यांना हजारो रुपयांनी लुटल्या जात आहे व ही योजना चालवणारे संचालक हे २२ हप्त्यामध्ये लख्खोपती बनत असल्याचे दिसून येत आहे या बचत गटाच्या सीआरपी आपली फी घेऊन त्यांचे कॅशबुक लिहून देत असतात त्याचाच फायदा घेऊन कमिशनवर ह्या सीआरपी महिलांकडून हप्त्याचे पैसे या ड्रा करता वसूल करीत आहेत.प्रत्येक महिलेकडून एकूण एक हजार दोनशे तीस रुपये प्रमाणे दोन हजार महिलांकडून ही वसुली या माध्यमातून केल्या जात आहे.अशी कोणतीही सरकारी योजना बचत गटा करता नसून ही उपहार योजना म्हणजे महिला बचत गटाच्या महिलांची फसवणूक आहे अशा कोणत्याही फसव्या योजनेला महिलांनी किंवा इतर कोणीही बळी पडू नये आणि ही योजना चालवणारे संचालक तसेच पैसे वसूल करणारे महिला बचत गटाची सीआरपी यांचेवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी बचत गटातील काही महिला करीत आहेत.

# रेल्वे प्रशासन व लोक प्रतिनिधींच्या अक्षम्य दुर्लक्षा मुळे वरोरा तालुकावासी ट्रेनच्या थाब्यांपासून वंचित

## वरोरा रेल्वे प्रवाशांचे प्रश्न सोडवा, अन्यथा आंदोलन – राजेंद्र मर्दाने

**वरोरा । प्रतिनिधी**

कोरोना संक्रमणाच्या लॉक डाऊन काळात बंद केलेल्या गाड्या पुन्हा सुरू कराव्यात, वरोरा रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा द्यावा तसेच मुंबई, पुण्यासाठी दररोज २२/२४ डब्याची सुपर एक्सप्रेस चालविण्यात यावी, अशी येथील नागरिकांची प्रलंबित मागणी असून रेल्वे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या मागणीकडे कमालीचे दुर्लक्ष करीत आहेत. वरोरा – भद्रावती– चंद्रपूर स्थानकावर प्रवाश्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तात्काळ सकारात्मक निर्णय घ्या, अन्यथा आंदोलनाचा इशारा वरोरा – भद्रावती – चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघाचे अध्यक्ष राजेंद्र मर्दाने यांनी दिला आहे . याबाबत उपविभागीय अधिकारी डॉ. शिवनंद लंगडापुरे यांना निवेदन देण्यात आले.मागील काही महिन्यांपूर्वी वरोरा – भद्रावती – चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघाच्या वतीने वरोरा रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्या अनुक्रमे १२७९१ / ९२ सिकंदराबाद पटना एक्सप्रेस,१२६१५ / २६ जी.टी. एक्सप्रेस२२६४५ / ४६ अहिल्यानगरी एक्सप्रेस १२९७५ /७६ जयपूर एक्सप्रेस, १२५११ /१२ गोरखपूर एक्सप्रेस, १२९९५ / ९६ संघमित्रा एक्सप्रेस, ११०४० / ४१ धनबाद कोल्हापूर एक्सप्रेस , १२७६७ / ६८ संतरागाछी एक्सप्रेस चा थांबा देण्यात यावा, अशी न्याय्य मागणी आहे. कोरोना संक्रमणाच्या लॉक डाऊन काळात बंद केलेल्या गाड्या ( नंदीग्राम एक्सप्रेस, जयंती जनता एक्सप्रेस, आनंदवन एक्सप्रेस, पॅसेंजर, बल्लारशाह – मुंबई सेवाग्राम लिंक एक्सप्रेस) पुन्हा सुरू करण्यात याव्यात. मुंबई पुण्यासाठी प्रतिदिन २२ / २४ डब्यांची सुपर एक्सप्रेस चालविण्यात यावी. बल्लारशाह ते हावडा नवीन गाडी चालविण्यात यावी. सर्व पॅसेंजर ट्रेन पूर्ववत पुन्हा सुरू करण्यात याव्यात. वरोरा रेल्वे स्थानकावर स्वयंचलित पायऱ्या व लिफ्ट ची व्यवस्था करण्यात यावी. अशा आशयाचे सविस्तर स्वयंस्पष्ट निवेदन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी



वैष्णव यांचे नावे माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा ओबीसी आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहिर, चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, चंद्रपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार किशोर जोरगेवार, मध्य रेल्वेचे मुख्य महाव्यवस्थापक नरेश लालवाणी, नागपूर मध्य रेल्वेचे प्रबंधक, वाणिज्य (प्रबंधक), चंद्रपूर जिल्हाधिकारी विनय गौडा, वरोरा उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगडापुरे आदींना देण्यात आले होते. या मागण्यांचा प्रस्ताव वरिष्ठ अधिकारी व केंद्रीय रेल्वेमंत्री मंत्री यांना पाठवून त्याच्या पूर्ततेसाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आश्वासन मान्यवरांनी दिले होते. सोबतच वेळोवेळी याबाबत जनप्रतिनिधींना विचारणाही करण्यात आली. परंतु अपवाद वगळता लोकप्रतिनिधी यांनी याबाबत पाठपुरावा केला नसल्याचे दिसून येते. परिणामतः बराच कालावधी लोटूनही प्रवाशांच्या रास्त मागण्यांच्या संदर्भात एक साधे उत्तर वरिष्ठ स्तरावरून अजूनपर्यंत प्रवाशी संघाला देण्यात आले नाही, हा नाकर्तेपणाचा कळस आहे . रेल्वे प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या अक्षम्य दुर्लक्षामुळेच जनता रेल्वे गाड्यांच्या थाब्यांपासून वंचित आहेत. त्यामुळे त्यांना जाग आणण्यासाठी आंदोलनाशिवाय दुसरा पर्याय राहिला नसल्याचे राजेंद्र मर्दाने यांनी सांगितले. प्रवाश्यांच्या मागण्या रास्त आहे. वरोरा रेल्वे स्थानकावर गाड्या थांबणे गरजेचे आहे. त्यामुळे रेल्वे प्रवाश्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी तात्काळ निर्णय घ्या. अन्यथा रेल्वे संदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी ३० नोव्हेंबर पासून आंदोलन करण्याचा इशाराही मर्दाने यांनी दिला आहे.शिष्टमंडळात माजी प्राचार्य बळवंतराव शेलवटकर, बंडू देऊळकर, प्रवीण सुराणा, जगदीश तोटावार, खेमचंद नेरकर, मयुर दसुडे आदींचा समावेश होता.

## बाल दिवसाचं औचित्य साधून 'अल्ट्रा झकास' घेऊन येत आहे बालकांसाठी 'बर्फाची राणी' चित्रपट!

**मुंबई । प्रतिनिधी**

पृथ्वीतलावर जगत असताना काय चांगलं आणि काय वाईट ही समजूत कोवळ्या वयात जर मुलांच्या अंगी आली, तर माणसाची माणुसकी पृथ्वीवर कायम टिकून राहिल. म्हणूनच पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म आणि बाल दिवसाचं औचित्य साधून १४ नोव्हेंबर २०२३ रोजी लहान मुलांना माणूसपन शिकवणारा हॉलिवूडचा ॲनिमेटेड चित्रपट 'बर्फाची राणी' अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर येत आहे.




चित्रपटाची कथा एका मोठ्या राज्यातील राजा, जादूगर आणि बर्फात बंदिस्त झालेली शापित राणी यांच्या भोवती फिरते. गेर्डा ही एका सामान्य जादूगाराच्या घरात जन्मलेली असामान्य मुलगी आहे, जिला तूर्तास तिच्यात असणाऱ्या जादुई कौशल्याचे ज्ञान नाही. राजाने राज्यातील सर्व जादूगारांना धनाचे आमिष दाखवून बर्फाच्या राणीच्या जगात बंदिस्त केले आहे, जिथून कोणीही परत येऊ शकत नाही. त्यात गेर्डाचे आई वडील आणि भाऊही आहे. गेर्डा आपल्या कुटुंबाला सोडवण्यात यशस्वी होईल का? हे चित्रपटात कळणार आहे.पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मरणार्थ आणि बाल दिवसानिमित्त बालकांना मनोरंजनासोबतच माणूस म्हणून जगण्याची चांगली शिकवण देणारा चित्रपट 'बर्फाची राणी' अल्ट्रा झकासच्या माध्यमातून सादर करताना मनापासून आनंद होत आहे. असेच अनेक ॲनिमेटेड चित्रपट ओटीटीवर उपलब्ध असून आणखी नवनवीन चित्रपटांसाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

## डॉ.अंकुश आगलावे यांचा वाढदिवस मोठया उत्साहात साजरा

**वरोरा । प्रतिनिधी**

भाजपा जिल्हा महामंत्री ओबीसीचे डॉ. अंकुश आगलावे यांचा वाढदिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याचे वने मत्स्य व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केक कापून डॉ. आगलावे यांचा वाढदिवस साजरा करून उदंड आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.डॉ. आगलावे यांना नुकताच महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल रमेश बैस यांचे हस्ते समाजरत्न पुरस्काराने राजभवन, मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. या वाढदिवसाप्रसंगी सुधिर मुनगंटीवार यांनी डॉ. आगलावे यांचा सत्कार



व कौतुक केले व भविष्यातही सामाजिक कार्य सुरू ठेवून समाजसेवा करावी असे सांगितले.यावेळी भाजपा ज्येष्ठ नेते डॉ. भगवान गायकवाड, देवराव भोंगळे, इंजि. रमेश राजुरकर, सुरेश महाजन, नरेंद्र जीवतोडे , माजी नगराध्यक्ष अहेतेश्याम अली, देविदास ताजने, अमित चवले, प्रा. मधुकर टिपले , श्रीरंग चवले , आकाश भागडे, शुभम चांभारे तसेच मोठया संख्येने भाजपा वरोरा व भद्रावती येथील पदाधिकारी उपस्थित होते.

## नियमानुसार व गटाच्या मागणीनंतरच मानव विकास कार्यक्रमांतर्गत बचत गटातील महिलांना योजनेचा लाभ

### कृषीपयोगी उपकरण व मळणी यंत्राकरीता अर्थसहाय्य उपलब्ध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ(माविम),चंद्रपूरकडून मानव विकास कार्यक्रमांतर्गत जिवती तालुक्यातील भुरे येसापुर येथे सन २०२१–२२ मध्ये मंजूर योजना स्वयंसहाय्य महिला बचत गटातील महिलांना कृषीपयोगी उपकरण, मल्टी क्रॉप थ्रेशर (मळणी यंत्र) करीता अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले.

सर्वोदय लोकसंचालित साधन केंद्र (सीएमआरसी) गडचांदूर अंतर्गत मंजूर योजनेतील मळणी यंत्राकरीता लाभार्थी गटाकडून मागणी घेण्यात आली होती. भुरे येसापुर येथील भीमदेव महिला बचत गटाने दि. ५ ऑगस्ट २०२२ रोजी मळणी यंत्र योजनेकरीता ठराव घेऊन सर्वोदय लोकसंचालित साधन केंद्र, गडचांदूर कार्यालयाकडे मागणी केली होती.सीएमआरसी कडून सदर गटाला योजना मंजुरीचे आदेश दि.१० सप्टेंबर २०२२ नुसार देण्यात आले होते. भीमदेव गटाचे साहित्य खरेदीनंतर ९० टक्के अनुदानाचे मागणी पत्र सीएमआरसी, गडचांदूर येथे प्राप्त झाले होते. सीएमआरसीने माविम जिल्हा कार्यालयाकडे अनुदानाची मागणी केली होती. त्यानुसार, प्रत्यक्ष गावात जाऊन साहित्याची मोका तपासणी करण्यात आली व सदर साहित्य प्राप्तीबाबत जिओ टॅगिंग फोटो काढण्यात आले होते.तदनंतर, माविम कार्यालयामार्फत सीएमआरसीला अनुदानाची रक्कम उपलब्ध करून देण्यात आली. आणि सीएमआरसीद्वारे गटाच्या खात्यावर सदर रक्कम वर्ग करण्यात आली आहे. नियमानुसार व गटाच्या मागणीनंतरच योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच गटाला साहित्य प्राप्त झाले असल्याचे जिओ टॅगिंगमधील गटाच्या अध्यक्ष आणि सचिवासह मोका तपासणीचे फोटो उपलब्ध आहे. गटाचे अनुदान मागणी पत्र व सविस्तर कागदपत्रे कार्यालयाकडे उपलब्ध असल्याचे माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी प्रदीप काठोळे यांनी कळविले आहे.

## शेतजमीन असणाऱ्या मातंग समाज व तत्सम पोटजातीतील व्यक्तींकडून अर्ज आमंत्रित



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील ज्या लोकांच्या नावे शेतजमीन आहे, अशा व्यक्तींनी दि. ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जलनगर, चंद्रपूर येथे कार्यालयीन वेळेत कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत.अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे : शेतीचा सातबारा, जातीचा दाखला, आधारकार्ड, व पासपोर्ट साईझ फोटो आदी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. असे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, चंद्रपूरचे जिल्हा व्यवस्थापक श्री. राचर्लावार यांनी कळविले आहे.

# पत्रकारांच्या लेखणीचा उपयोग समाज परिवर्तनासाठी व्हावा–पालकमंत्री मुनगंटीवार

## सरदार हरविंदरसिंह धुन्ना लिखीत 'भारतीय पत्रकारिता का इतिहास' पुस्तकाचे प्रकाशन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बदलत्या काळात पत्रकारितेचेही आयाम आणि नियम बदलले आहेत. आज व्हॉट्सप युनिर्व्हसिटीच्या माध्यमातून चुकीची माहिती पसरविण्यात येत आहे. तसेच स्वत:च्या स्वार्थासाठी समाजात वैचारीक प्रदुषण वाढविण्यात येत आहे. त्यामुळे अशा बाबींना रोखण्याची ताकद पत्रकारांच्या लेखणीत असून या लेखणीचा उपयोग समाज परिवर्तनासाठी व्हावा, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ पत्रकार सरदार हरविंदरसिंह धुन्ना यांनी लिहिलेल्या 'भारतीय पत्रकारिता का इतिहास, कल–आज–कल' या पुस्तकाच्या दुस–या आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात उद्घाटक म्हणून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंजाब–महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंचचे प्रांताध्यक्ष एच.पी.सिंग तर प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी रावसाहेब मोहोड, ज्येष्ठ पत्रकार यशवंत दाचेवार, हरविंदरसिंह धुन्ना, डॉ. सतीश गोगूलवार, प्रा. विजय मुडे, राहुल पावडे, हार्दिक पाठक आदी उपस्थित होते.पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि त्यावरील छायाचित्र अतिशय आकर्षक असून हे पुस्तक ज्ञानवर्धक आहे, असे सांगून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, सरदार हरविंदरसिंह धुन्ना यांनी अतिशय मेहनतीने हे पुस्तक लिहिले आहे. ४०० पानांचे पुस्तक लिहिण्यासाठी त्यांनी किमान ४० हजार पाने वाचली असतील. भविष्यातसुध्दा त्यांनी आणखी पुस्तके लिहावीत. पत्रकारितेसाठी हे पुस्तक अतिशय मार्गदर्शक ठरणार असून गोंडवाना विद्यापीठात वृत्तपत्र पदवी आणि पदविका अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश करण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरू यांच्याशी चर्चा करण्यात येईल, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.पुढे ते म्हणाले, सुरवातीपासूनच धुन्नाजी यांच्या कुटुंबियाशी आपल्या कुटुंबाचे सौहार्दाचे संबंध राहिले आहेत. मी शिक्षणाने पत्रकार असून धुन्नाजी व्यवसायाने पत्रकार आहेत. माझ्या वृत्तपत्राचे प्रकाशन त्याकाळी धुन्नाजी यांच्या हस्ते करण्यात आले होते. आज त्यांच्या पुस्तकाचे विमोचन माझ्या हस्ते करण्यात येत आहे, ही माझ्यासाठी अतिशय आनंदाची बाब आहे. धुन्नाजी यांनी पत्रकारिता हे समाज परिवर्तनाचे साधन मानले



आहे. आजच्या युगात पत्रकारिता करणा–यांसाठी हे पुस्तक नक्कीच एक चांगली व्हॅक्सिन ठरावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.प्रास्ताविकात पुस्तकाचे लेखक आणि ज्येष्ठ पत्रकार हरविंदरसिंह धुन्ना म्हणाले, हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषेतील ही आवृत्ती वाचकांपर्यंत पोहचेल, अशी अपेक्षा आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार हे राज्याला लाभलेले विकासपुरुष आणि कर्तव्यनिष्ठ मंत्री आहेत. त्यांच्या हस्ते माझ्या पुस्तकाचे विमोचन होणे, हा एक अविस्मरणीय क्षण आहे. माध्यमांसमोर आज विश्वासअहर्तचे प्रश्नचिन्ह उभे असून बातमीदारांनी केवळ बातमीदार असावे, बातमीत स्वत:चे विचार व्यक्त करू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली.मागदर्शन करतांना ज्येष्ठ पत्रकार यशवंत दाचेवार म्हणाले, पत्रकारितेचा दृष्टीकोन बदलला असला तरी आजही प्रिंट मिडीयावर लोकांचा विश्वास कायम आहे. तिनही काळातील पत्रकारितेचे विश्लेषण या पुस्तकात आहे. निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी श्री. मोहोड म्हणाले, धुन्नाजी यांना ५४ वर्षांचा पत्रकारितेचा अनुभव आहे. लघु वृत्तपत्रांना एकत्र करून त्यांनी लढा दिला आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. डॉ. सतिश गोगूलवार म्हणाले, हरविंदरसिंह धुन्नाजी आणि मी बालपणीचे मित्र आहोत, एकाच शाळेत शिकलो. धुन्नाजी यांचे पत्रकारितेत मोठे योगदान आहे. तर प्रा. विजय मुडे म्हणाले, धुन्नाजी यांच्यात सुरवातीपासूनच प्रगल्भता होती, ती आजही आहे. पत्रकारिता अभ्यासक्रमासाठी हे पुस्तक उपयोगी पडेल, असे त्यांनी सांगितले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा–या व्यक्तिंचा तसेच संस्थांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासावर हार्दिक पाठक यांचे व्याख्यान झाले.कार्यक्रमाचे संचालन प्रा. आरती दाचेवार यांनी केले. कार्यक्रमाला पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.एस.एन.डी.टी. विद्यापीठात पत्रकारिता अभ्यासक्रम : जिल्ह्यात तरुणी आणि महिलांसाठी एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्यात येत असून कौशल्य विकासावर आधारीत ६२ प्रकारचे अभ्यासक्रम येथे शिकविण्यात येतील. पत्रकारिता हा अभ्यासक्रमसुध्दा यात समाविष्ट आहे. या माध्यमातून जिल्ह्यात महिला पत्रकारांची संख्या वाढण्यास मदत होईल.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .